**सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.**
**शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.**
**Ph.No** : (0721) 2573027, 2572577
**Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in
**Website**: www.jdroamt.org
**Fax No**: (0721) 2577913

क्रमांक :- विकाअ/शिक्षण /प्रवेश/२०२१/ ७९८
दिनांक :- २५/७/२०२१

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र पदवीका/पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,
तसेच एमबीए/एमसीए पदव्युत्तर पदवी संस्था, अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी तांत्रिकी व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशसाठी संस्थांची माहीती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.**

**संदर्भ** :- १.मा.संचालक, तंशिस., म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १०/एडीएम/Intake Approval/२०२१/४५२ दिनांक १७ जुन २०२१.
२.या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/प्रवेश/२०२१/७३० दि. २४ जुन २०२१.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ वर्षासाठी पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेकरीता सहभागी संस्थाची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अचूक व अद्ययावत करण्याबाबत पदवीका संस्थानी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता प्राप्त झालेले संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, फॉर्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची मान्यता तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडून संलग्निकरण / समकक्षता प्रदान केल्याची माहिती **दिनांक ०२.०७.२०२१ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यत** तसेच पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थानी **दिनांक १६.०७.२०२१ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यत** http://dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने सादर कराण्याबाबत कळविलेले होते तसेच संदर्भिय पत्रासोबत जोडलेल्या प्रपत्रात नमूद दिनांकास जिल्हानिहाय संस्थानी प्रत्यक्ष कामकाज हाताळण्या-या अधिकारी/कर्मचारी यांनी या कार्यालयात उपस्थित राहून सादर करण्याबाबत कळविलेले होते.

तथापी तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांच्यामार्फत सदर माहीती अद्ययावत करण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात येणारी लिंक (http://dtemaharashtra.gov.in)अजुनपर्यंत सुरु न झाल्याने माहीती अद्ययावत करण्याबाबतचा कार्यक्रम पुढे ढकलण्यात येत आहे. तरी संदर्भिय पत्रासोबत जोडलेल्या वेळापत्रकामध्ये नमुद दिनांकास संस्थांनी या कार्यालयात उपस्थित राहु नये. माहीती अद्ययावत करण्याबाबतचा जिल्हानिहाय दिनांक पुढे आपणास कळविण्यात येईल, याची संस्थाप्रमुखांनी नोंद घ्यावी.

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :-** १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना माहीतीकरीता सविनय सादर.
२.प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.